अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ८ सप्टेंबर २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३४० वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## पुण्यात जोरदार पावसाची शक्यता; घाटमाथ्यावर मुसळधारेचा इशारा

सुराज्य/पुणे

शहरासह संपूर्ण जिल्ह्यातच दिवसभर ढगाळ हवामान आणि दुपारनंतर बहुतेक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या जोरदार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. याच काळात जिल्ह्यातील घाटमाथ्यावर मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

गुरूवारी सकाळपासूनच पुणे शहरासह जिल्ह्यात ढगाळ हवामान होते. तुरळक ठिकाणी अति हलक्या ते हलक्या स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली होती. सध्या पुण्यासह संपूर्ण राज्यातच मॉन्सून पुन्हा सक्रीय झाला असून, पुढील दोन दिवसांत त्याची तिव्रता वाढण्याची शक्यता आहे.सध्या बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र निवळल्यानंतर ओडिशा आणि छत्तीसगड



परिसरावर समुद्र सपाटीपासून ७.६ किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे वाहत आहेत. ही प्रणाली मध्य प्रदेशाकडे सरकण्याची शक्यता आहे. मॉन्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा सर्वसाधारण स्थितीच्या दक्षिणेकडे आला असून, जैसलमेर, उदयपूर, इंदोर, बेतूल, गोंदिया, रायपूर, गोपालपूर ते पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे.

# पालकमंत्री भडकले, प्रशासनाचे कान टोचले

- जलजीवन योजनेचे बारा वाजले
- आमदारांनी डीपीसीचे लक्ष वेधले

सुराज्य/सोलापूर

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जलजीवन मिशन ड्रीम प्रोजेक्ट आहे. सर्वांना स्वच्छ पाणी देण्यासाठी कोट्यवधी रूपयांचा निधी दिला जात आहे. मात्र या योजनेला हरताळ फासण्याचे काम सोलापूर जिल्ह्यामध्ये होत आहे. अधिकारी आणि मक्तेदार यांच्यातील साटेलोट्यामुळे ही योजना बदनाम होत आहे. जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी या प्रकरणात लक्ष घालून जलजीवनची कामे सुधारत सरकारची बदनामी थांबवावी, असा आदेश पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला.**



गुरूवारी नियोजन भवनच्या सभागृहात पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या(डीपीसी) बैठकीत जलजीवन कामाप्रश्नी जिल्हयातील सर्व आमदार आक्रमक झाले. माळशिरसचे आमदार राम सातपुते यांनी जलजीवनच्या प्रश्नाला वाचा फोडली. या विषयावरील चर्चेत बबनराव शिंदे, यशवंत माने, समाधान अवताडे या आमदारांनीही जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाअंतर्गत चालणाऱ्या या योजनेच्या कारभारावर संताप व्यक्त केला. माळशिरस तालुक्यातील काही गावे आणि वाड्या वस्त्यांवर जलजीवन मिशनचे काम अतिशय बोगस सुरू आहे. या योजनेचे काम म्हणजे केवळ ठेकेदाराचे घर भरण्याचा प्रकार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी यात लक्ष घालावे, अन्यथा वाड्या वस्त्यावरील माय माऊल्या, भावी पिढी आम्हाला माफ करणार नाही, अशा शब्दात आमदार सातपुते यांनी आपला संताप व्यक्त केला.

कामाच्या सर्व्हेपासून ते निविदा मॅनेज करणे, बोगस पाईप वापरच्या कामापर्यंत भ्रष्टाचार आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रॅन्डम पध्दतीने या कामाची तपासणी करावी, अशी सूचना आमदार बबनराव शिंदे यांनी केली तसेच या सर्व योजनांना सौर उर्जेचे पॅकेज देण्याचीही मागणी त्यांनी केली. या योजनेतील कामाबाबत अधिकारी, अभियंते एकमेकांकडे बोट दाखवितात. सर्व झालेले सरपंचांनाही माहीत नसते, अशी धक्कादायक माहिती आमदार यशवंत माने यांनी सभागृहात दिली. आमदार समाधान आवताडे व आमदार शहाजी पाटील यांनी म्हैसाळ व टेंभू योजनेला टंचाई योजनेतून निधी देण्याची मागणी केली. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी महावितरणकडील ट्रान्सफॉर्मरचा मुद्दा उपस्थित केला.

कुंभारी व सात गावांसाठी असलेली प्रादेशिक पाणीपुरवठा योजना गेल्या सात वर्षांपासून बंद आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थिती उद्‌भवते तेव्हा नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावतो. आता कुंभारी परिसरात साकारत असलेल्या रे नगरला एनटीपीसीकडून पाणी देण्याची योजना आहे. या योजनेतून कुंभारीला पाणी मिळावे, अशी मागणी जिल्हा परिषदेचे माजी सभागृहनेता अण्णाराव बाराचारे यांनी केली.

### आ.प्रणिती शिंदे यांनी अखेर चिमटा काढला

सकाळाच्या बैठकीस सत्ताधारी पक्षाचे आ. विजयकुमार देशमुख आणि सुभाष देशमुख यांच्या गैरहजरी बाबत आ.प्रणिती शिंदे यांनी चिमटा काढला. विखे-पाटील यांनी मात्र दोन्ही आमदारांना अनुपस्थितीवरून सावरुन घेण्याचा प्रयत्न केला. बैठकीस उस्मानाबादचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचे अडीच वाजता सभागृहात आगमन झाले परंतु विखे पाटील यांनी निंबाळकर येतात पाच मिनिटांनी नियोजन समितीची बैठक एक तासासाठी तहकूब करत ते जेवायला निघून गेले. अडीच वाजल्यापासून ते साडेतीन वाजेपर्यंत ओमराजे निंबाळकर सभागृहात बसून होते. साडेतीन वाजता पुन्हा बैठक चालू झाली या बैठकीस पहिल्या सत्रात आक्रमक झालेले आमदार आणि भाजपचे माढ्याचे खासदार दिसून आले नाहीत. मात्र बैठक चालू असताना आ, सचिन कल्याण शेट्टी आणि यशंवत माने यांचे आगमन झाले मात्र त्यांनी दुसऱ्या सत्रात चर्चेत सहभाग घेतला नाही. थोड्या वेळाने आमदार प्रणिती शिंदे यांचे आगमन झाले. त्यांनी विमानतळ आणि शहराच्या पाणी पुरवठ्यावर आक्रमक होत चर्चेत सहभागी झाल्या. ओमराजे निंबाळकर यांनी बैठक हयजॅक करत विषय धडाधड मांडण्यास सुरुवात केली.

### पहिल्या सत्रात आक्रमक, दुसऱ्या सत्राला दांडी...

डीपीसीच्या बैठकीत नियोजनाचा अभाव दिसून आला. पहिल्या सत्रात जिल्हामध्ये दुष्काळावर, चारा -पाणी, पशुधन वाचवण्यावर सर्व आमदार आक्रमक झाले मात्र बैठकीच्या दुसऱ्या सत्रात मात्र बहुतांश आमदारांनी दांडी मारली तर धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर हे नियोजन समितीच्या बैठकीत विविध विषयांवरून चांगलेच आक्रमक झाले. दुसऱ्या सत्राची बैठक त्यांनी हायजॅक केली मात्र सोलापूरचे मौनी खासदरांनी आक्रमक ओमराजे निंबाळकर यांच्या शेजारी बसून होते. डीपीसीच सभा तब्बल सात महिन्यांनी झाली. दोन दिवसांच्या सोलापूर दौऱ्यांवर आलेल्या पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पाणी पुरवठा, चारा टंचाई, लंपी आजार, विमानतळ आणि जलजीवनच्या कामाप्रश्नी मॅरेथॉन बैठक घेतली. बैठकीत तब्बल दोन तास टंचाईवर चर्चा करण्यात आली. सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य हे सुद्धा या बैठकीला उपस्थित होते परंतु या दोन तासात त्यांनी तोंडातून एक शब्दही काढला नाही गुरुवारी मौनव्रत असल्याचे सांगण्यात आले मात्र विमनताळ संदर्भात आ. प्रणिती शिंदे आणि अमोल शिंदे विषय मांडत असताना आपणही काही कमी नाही, हे सांगण्याचा प्रयत्न करत विमानसेवा चालू करण्यासाठी त्यांनी विमाननागरी वाहतूक मंत्री ज्योतीरादित्य शिंदे यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्याचे पत्र मोबाईल मधून काढून देत धाराशिवचे खासदारांना चक्क वाचण्यास दिले.

### दोन मंडल का वगळले?

बार्शी तालुक्यात पाऊस कमी असतानाही दोन मंडल वगळले कसे काय? असा प्रश्न खा.ओमराजे निंबाळकर यांनी उपस्थित केला. त्यावर पालकमंत्र्यांनी सुरुवातीला यावर चर्चा झालेली आहे, उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी फळबाग अनुदान मिळाले नसल्याचा मुद्दा मांडला तसेच गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमध्ये वाहून गेलेल्या जनावरांची नुकसान भरपाई अद्याप मिळाली नसल्याचा मुद्दा उपस्थित करून बैठक गाजवली.



**गो..गो...गोविंदा...** बाळीवेस येथील विजय चौकात माजी नगरसेवक विनायक विटकर यांनी दयावान ग्रुपच्या वतीने दहीहंडीत चांद्रयानाची प्रतिकृती साकारली.

## नियोजन समितीच्या बैठकीत विमानतळावर वायफळ चर्चा

### उपवनसंरक्षक अधिकाऱ्यांचा माळढोक पाहिल्याचा दावा

सुराज्य/सोलापूर

विमानसेवेला अडथळा ठरलेली चिमणी पडली आता सोलापूरची विमानसेवा कधी सुरू होणार असा प्रश्न नियोजन समितीचे सद्स्य अमोल शिंदे यांनी बैठकित पालकमंत्र्यांना विचारला इतर विमाने उतरता मग आपले विमान आले प्रवासी विमान सेवा कधी चालू करणार हा विषय चालू असताना आ. प्रणिती शिंदे यांनी बोरामणी विमानतळाचा विषत पुढे रेटला यावर चर्चा झाली मात्र ठोस निर्णय झाला नाही. विमानसेवेवर वायफळ चर्चा झाली ठोस निर्णय झाला नाही मात्र उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील यांनी माळढोक पाहल्याचा दावा केला.

या परिसरात माळढोकचा अधिवास असल्याचे सागितले आ. प्रणिती शिंदे यांनी माळढोक नसल्याचे उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील यांनी दिलेले पत्र पालकमंत्र्यांना दाखवताच एकच खळबळ माजली.

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकित दुपारच्या सत्रात सोलापूरच्या विमानसेवेचा विषय निघाला. अमोल शिंदे यांनी विमानसेवा कधी सुरू होणार असा प्रश्न विचारला. तर आमदार प्रणिती शिंदे यांनी हा विषय होटगी रोड विमानतळाकडून बोरामणी विमानतळाकडे वळवला. या भागात माळढोक आहे असे सांगितले जाते मात्र आता पर्यंत पाहिला नाही. एकच माळढोक असताना विमानतळाचा प्रश्न रखडला आहे. तो देखिल कोणीही पाहिलेला नाही, असे ठामपणे आमदार शिंदे यांनी सांगितले. यावर पालकमंत्र्यांनी उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील यांना खुलास विचारला असता पाटील यांनी






या भागात माळढोक आहे. होय, अनेकदा पाहिला आहे. त्याचे फोटोही आपल्याकडे आहेत, असे ठाम पणे सांगत बोरामणी विमानतळ प्रस्ताव फेटाळला असल्याचा दावा केला यावर पालकमंत्री देखिल पाटील यांच्या एकडे पाहत एक माळढोक आहे, त्यांचे स्टेस्ट ठेवा माला दाखवा असे सांगत पाटील यांची फिरकी घेतली तर आ. प्रणिती शिंदे यांनी वनविभागाने यापुर्वी माळढोक नसल्याचे दिलेले पत्र पालकमंत्र्यांना सादर करत वनविभागाचा भांडाफोड केला तर उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील यांनी माळढोक असल्याचे दुसरे पत्र आपल्याकडे असल्याचे सांगत सर्वांना बुचकळ्यात पाडले. यावर चर्चा झाली यावेळी आमदार प्रणिती शिंदे यांनी सुरत -चेन्नई महामर्गाला वनविभागाने हरकत घेतलेली नाही. मात्र, बोरामणी विमानतळालाच वनविभागाने हरकत का घेतली असा प्रतिसवाल केला. उपवनसंरक्षक पाटील यांनी सुरत-चेन्नई महामार्गाला अद्याप ना हरकत देण्यात आलेली नाही. फक्त प्रस्ताव दाखल केलेला आहे. वनविभागाच्या वतीने ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. सुरत-चेन्नई महामार्ग हा वन्यजीव विभागाच्या क्षेत्राबाहेरून खुलास केला. तर विमानतळ प्राधिकाकरणाचे चापला यांना होटगी रोडवरील विमानतळा संदर्भात समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यामुळे बैठकित विमानतळाची चर्चा झाली मात्र ठोस निर्णय झाला नाही माळढोक पाहिला असल्याच्या दाव्याची पालकमंत्र्यांनी बैठकित चांगली खिल्ली उडवली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



दप्तराचे ओझे तपासणार होते ते..

कल्याण
380-19-234

मुंबई
360-98-567

## जरांगेंनी जीआर फेटाळला; कुणबी दाखल्याचा वाद उफाळला

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्यभरात गुरूवारी दहिहंडी सोहळ्याची धामधूम असताना तिकडे जालन्यात उपोषणकर्ते मनोज जरांगे-पाटील यांना महायुतीच्या सरकारकडून पटवण्याचे काम सुरू होते. शिष्टाईसाठी माजी राज्यमंत्री अजून खोतकर यांना सरकारने पाठवले होते. शासनाचा जीआर घेवून खोतकर जालन्याला गेले होते. कुणबी दाखल्याचा इश्यू मिटेल आणि जरांगे हे उपोषण सोडतील, अशी महाराष्ट्राला अपेक्षा होती परंतु सरकार आणि जरांगे यांच्यात पुन्हा भिनसले.**

कुणबी दाखला देण्याबाबत सरकारने काढलेला जीआर जरांगे यांनी फेटाळून लावला. 'वंशावळीचे दस्तावेज असतील तर...' याऐवजी 'सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येईल', एवढी सुधारणा करुन सरकारने नव्याने जीआर प्रसिद्ध करावा, असा हट्ट जरांगे यांनी खोतकरांकडे केला. त्यांची ही विनंती सरकारने फेटाळून लावली. जरांगे हे उपोषणावर ठाम राहिले. समन्वयाची 'हंडी' नाही फुटली. कोंडी कायम राहिली. दरम्यान कुणबी दाखले दिल्यास ओबीसींच्या हक्कावर गदा येणार असल्याने सरकारचा हा डाव हाणून पाडू, असा इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाने दिला आहे. त्यामुळे



सरकार आता पुढचे पाऊल काय उचलणार याकडे राज्याचे लक्ष लागून आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी निर्देश दिल्याप्रमाणे मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी - मराठा जात प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्तींची समिती नेमण्याचा शासन निर्णय गुरूवारी जारी करण्यात आला. याशिवाय जरांगे पाटील यांना आपले उपोषण मागे घेण्याची विनंती करणारे सचिव सुमंत भांगे यांचे पत्रही देण्यात आले. जरांगे पाटील यांनी सरसकट मराठ्यांना कुणबी दाखले देण्याची मागणी केली होती. मात्र शासनाने निजामकालीन महसुली अभिलेखात किंवा शैक्षणिक अभिलेखात नाव असलेल्या मराठ्यांनाच दाखले मिळतील, असे शासन आदेशात म्हटले आहे.

आमच्याकडे कोणाकडेच वंशावळीचे दस्ताऐवज नाहीत. त्यामुळे आम्हाला सरकारच्या निर्णयाचा एक टक्काही फायदा नाही. त्यामुळे सरकारने आपल्या अधिसूचनेत एक लहानसा बदल करावा. 'वंशावळीचे दस्तावेज असतील तर' याऐवजी 'सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येईल', एवढी सुधारणा करुन सरकारने नव्याने जीआर प्रसिद्ध करावा, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली होती. मात्र जरांगे त्यांची ही विनंती सरकारने फेटाळून लावत सरसकट दाखले न देता निजामकालीन महसुली अभिलेखात किंवा शैक्षणिक अभिलेखात नाव असलेल्या मराठ्यांनाच दाखले मिळतील, यावर शासन ठाम राहिले.

**जरांगे काय म्हणाले? :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी निर्णय घेण्याचे धाडस दाखवले. त्यामुळे किमान मराठा समाजाला आरक्षण मिळण्याची प्रक्रिया सुरु झाली. त्यामुळे सरकारच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. पण वंशावळीचे दस्ताऐवज नसल्याने आम्हाला निर्णयाचा फायदाच होणार नाही. सरकारने आमची अडचण समजून घ्यावी. आमची अडवणूक प्रशासनच करत आहे. आमचं एवढंच म्हणणं आहे की, निर्णयात थोडी सुधारणा करा, सरसकट दाखले देण्यात यावेत, अशी भूमिका जरांगे पाटील यांनी मांडली.

**डाव हाणून पाडणार :** मराठा समाजाला ओबीसी समाजातून कुणबी प्रमाणपत्र द्वारे आरक्षण देण्याचा डाव सुरू आहे, त्याला हाणून पाडण्यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघ तर्फे चंद्रपूर शहरात ओबीसी महापंचायतीचे आयोजन करण्यात आले आहे. मराठा समाजाला जर कुणबी प्रमाणपत्र दिल्यास सर्व ओबीसी जाती संघटनेवर त्याचा परिणाम पडण्याची शक्यता आहे. मात्र सरकार त्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी हालचाल करीत आहे. त्यामुळे ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का पोहचू शकतो, यावर आता ओबीसी समाजाने जागृत व्हावे यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे चंद्रपूर शहरात शुक्रवार ८ सप्टेंबरला सरदार पटेल महाविद्यालय जवळील आयएमए सभागृहात ओबीसी महापंचायतीचे आयोजन सायंकाळी ४ वाजता करण्यात आले आहे.